नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०५/२०२५ (सोमवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील मा.ना.श्री. अमित शहा, गृहमंत्री, भारत सरकार यांचा दौरा बंदोबस्त यशस्वीपणे पार पाडल्याबाबत

आज दिनांक २६/०५/२०२५ रोजी मा. ना. श्री. अमित शहा, गृहमंत्री भारत सरकार यांच्या हस्ते नागपुर ग्रामीण जिल्हयातील खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत चिंचोली येथील नॅशनल फॉरेन्सीक सायन्स युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसचे भुमीपुजनाचा समारंभ होता. मा गृहमंत्री, भारत सरकार यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदोबस्ताचे योग्य व काटेकोर नियोजन आवश्यक होते त्याकरीता मा. गृहमंत्री, भारत सरकार यांच्या सुरक्षेकरीता असलेल्या सर्व नियमावली व निर्देशानुसार नियोजन करून त्यांची पुर्णता अंमलबजावणी करून नागपुर ग्रामीण जिल्हयात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता. संपुर्ण बंदोबस्ताचे प्रभारी अधिकारी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा हे होते. मा. श्री. रमेश धुमाळ ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा हे बंदोबस्ताचे सहप्रभारी अधिकारी होते. जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात सदर बंदोबस्ताची योग्य आखणी करून कॅन्वॉय ,हेलीपॉड, रोड बंदेबस्त, कार्यक्रम स्थळ बंदोबस्त असा बंदोबस्त आराखडा तयार केला होता. सदर बंदोबस्तात एकुण १ अपर पोलीस अधिक्षक, ८ उपविभागिय पोलीस अधिकारी, २२ पोलीस निरीक्षक, ४३ सपोनि /पोउपनि, २९४ पोलीस अंमलदार , २८ महीला पोलीस अंमलदार , ३३ वाहतुक पोलीस अंमलदार ,बि.डी.डी.एस पथक, आर.सी.पी. पथक आणि क्युआरटी पथक असे अधिकारी/अंमलदार यांनी काटेकोर पणे कर्तव्य पार पाडल्याने मा गृहमंत्री, भारत सरकार यांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील दौरा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला.

## पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील कॉन्फीडन्स पेट्रोलियम प्रा.लि. ,बोरूजवाडा शिवार येथील कॅम्प्रेसर एअर टॅकला लागलेली लोखंडी प्लेट उडुन झालेल्या घटनेबाबत..

**पोलीस स्टेशन सावनेर :—** फिर्यादी नामे दिलीप किसनजी लोणकर, वय ३२ वर्षे,रा कुसुंबी,ता सावनेर, जि नागपुर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे रिपोर्ट दिली की, दिनांक २४/०५/२०२५ रोजी १७:३० वाजता चे सुमारास पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील कॉन्फीडन्स पेट्रोलियम प्रा.लि. बोरूजवाडा शिवार येथे काम करणारा गजानन बसोटीया हा कॉन्फीडन्स पेट्रोलियम प्रा.लि. येथे कॉम्प्रेसर एअर टॅक मेन्टेनन्स चे काम करीत असतांना कॉम्प्रेसर एअर टॅक मध्ये हवेचा उच्च दबाव वाढल्याने कॅम्प्रेसर एअर टॅकला लागलेली लोखंडी प्लेट उडुन गजनान बसोटीया याला धडकली त्यामुळे गजानन बसोटीया हा समोरील भिंतीवर फेकल्या गेला.त्यात त्याचा डावा पाय मांडीपासुन वेगळा झाला आहे.अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सावनरे अप क्रं ४७२/२०२५ कलम २८९,१२५ ब भा.न्या.सं अन्वये अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जखमी गजानन बसोटीया याला कॉन्फीडन्स पेट्रोलियम प्रा.लि. द्वारे ताबडतोब उपचाराकामी नागपुर येथे दवाखान्यात दाखल केले आहे.जखमीवर उपचार सुरू आहे.सदर घटनास्थळाला श्री अनिल मस्के ,सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी भेट दिली. सदर घटनेनंतर घटनास्थळावर तात्काळ नागपुर ग्रामीण जिल्हयातील फॉरेन्सीक व्हॅन बोलावुन त्यांच्याद्वारे फॉरेन्सीक पुरावे गोळा करण्यात आले आहे. .औदयोगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालय, Directorate of Industrial Safety and Health (DISH) चे अधिकारी यांनी सुध्दा घटनास्थळी भेट देवुन पाहणी केली असुन त्यांचा अहवाल प्राप्त होणे बाकी आहे सदर गुन्हयाचा तपास सावनेर पोलीस करीत आहे.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक २५/०५/२०२५ रोजी अरोली पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेती चोरटी वाहतुक केली जात आहे. पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान किरणापूर येथे तुमसर कडुन येणारा टाटा कंम्पनी चा टीप्पर क्रमांक एम. एच. ४९ ए. टी. १८१७ हा मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **रविद्र प्रिंतमसिंग पटले, वय. ३० वर्ष,रा. बोटेझरी ता. वाराशिवनी जि.बालाघाट** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **तसेच सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) ३ ब्रास रेती किंमती १५,०००/— रूपये आणि २) एक टीप्पर क्रमांक एम. एच. ४९ ए. टी. १८१७ किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण २०,१५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

वाहन चालक /मालक आरोपी नामे रविद्र प्रिंतमसिंग पटले, वय. ३० वर्ष,रा. बोटेझरी ता. वाराशिवनी जि.बालाघाट, **याच्या** विरूध्द पोस्टे अरोली येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**